ठाणे, गुरुवार दि. १९ सप्टेंबर २०२४ वर्ष : १३, अंक : १४२ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

अग्रलेख

**एक देश, एक निवडणुक संकल्पना कितपत व्यवहार्य ?**

केंद्रीय मंत्रिमंडळाने दि. १८ सप्टेंबर रोजी एक देश एक निवडणूक प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. या मंजुरीनंतर हिवाळी अधिवेशनात हे विधेयक संसदेत मांडले जाणार असल्याची शक्यता आहे.

.......पान २ वर

दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे

# अल्पवयीन मुलांसाठी स्पेशल NPS वात्सल्य योजनेचा श्रीगणेशा!

**नवी दिल्ली : अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी १८ सप्टेंबर रोजी NPS वात्सल्य योजनेचा श्रीगणेश केला आहे ज्याची अलीकडेच २०२४-२५ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात घोषणा केली होती. देशातील सर्व मुलांना मजबूत आर्थिक पाया प्रदान करण्याचा या योजनेचा उद्देश असून या कार्यक्रमात अर्थमंत्र्यांसह शाळकरी मुलेही सहभागी झाली होती तर, NPS वात्सल्य योजना सबस्क्राइब करण्यासाठी ऑनलाइन प्लॅटफॉर्म सुरू केले जाईल. तसेच योजनेशी संबंधित तपशील जाहीर केले जातील आणि या योजनेत सामील होणाऱ्या अल्पवयीन ग्राहकांना अर्थमंत्री कायम सेवानिवृत्ती खाते क्रमांक सुपूर्द करण्यात आले.**

## NPS वात्सल्य योजनेत गुंतवणुकीचे तपशील

NPS वात्सल्य योजनेद्वारे पालक पेन्शन खात्यात गुंतवणूक करून मुलाच्या भविष्यासाठी बचत करू शकतील. दीर्घकाळात मोठा निधी या योजनेत चक्रवाढचा उपयोग केला जातो आणि यामध्ये गुंतवणुकीचे अनेक पर्याय आहेत. पालक आपल्या मुलाच्या नावावर वार्षिक १,००० रुपयांची गुंतवणूक सुरुवात करू शकतात ज्यामुळे ही योजना समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचेल. ही योजना सर्वसमावेशकता आणि आर्थिक सुरक्षिततेला प्रोत्साहन देते.




## NPS वात्सल्य योजनेचे प्रमुख फायदे

- **लहानपणापासून पेन्शन योजना:** या योजनेमुळे मुले लहानपणापासून पेन्शन योजनेशी जोडली जातील.
- **दीर्घकालीन गुंतवणूक:** दीर्घकाळ गुंतवणूक केल्यास संपत्ती वाढण्याची शक्यता जास्त असते.
- **कर लाभ:** या योजनेतील गुंतवणुकीवर कर लाभ मिळू शकतात.
- **लवचिकता:** योजनेतील गुंतवणूकीची रक्कम आणि कालावधी लवचिकपणे निवडला जाऊ शकतो.
- **मुलाची मालकी:** खाते मुलाच्या नावावर असल्यामुळे त्याचे स्वतःचे भविष्यातील निर्णय घेता येतील. १८ वर्षे पूर्ण झाल्यावर मुल खात्यातून पैसे काढू शकते किंवा वयाच्या ६० व्या वर्षी पेन्शन घेऊ शकते.

## NPS वात्सल्य योजनेचा लॉक-इन कालावधी काय?

या योजनेअंतर्गत तीन वर्षांच्या लॉक-इन कालावधीनंतर शिक्षण, गंभीर आजार आणि अपंगत्व यासारख्या गरजांसाठी जमा रकमेपैकी २५ टक्के रक्कम काढण्याची सुविधा देण्यात आली असून खात्यातून जास्तीत जास्त केवळ तीन पैसे काढले जाऊ शकते. केंद्रीय अर्थसंकल्प २०२४ मध्ये खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी राष्ट्रीय पेन्शन प्रणाली (NPS) मध्ये नियोक्त्याकडून कपातीचा दर कर्मचाऱ्यांच्या पगाराच्या १० टक्क्यांवरून १४% करण्याचा प्रस्ताव देण्यात आला आहे.

## NPS वात्सल्य योजनेत तुम्ही गुंतवणूक करावी का?

योगदान मर्यादा वाढवल्याने कामगारांची सामाजिक सुरक्षा मजबूत होईल. NPS वात्सल्य योजना ही पालकांसाठी आपल्या मुलाचे भविष्य सुरक्षित करण्याची उत्तम संधी असेल. लवकर सुरुवात करून आणि नियमित बचत करून, कुटुंबे त्यांच्या मुलांसाठी मोठी संपत्ती निर्माण करू शकतात. ही योजना सर्व वयोगटातील लोकांसाठी आर्थिक सुरक्षिततेच्या सरकारच्या संकल्पनेशी सुसंगत आहे.

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

| कमाल | किमान |
| --- | --- |
| ३६° से | २९° से |

**बाजार**

| सोने | चांदी |
| --- | --- |
| ७३,२८० | ९३,६८० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



मुलाला राजकारणातच पाठवावे लागणार असे वाटते. गधडा बारावीत नापास झाला नं? त्याला अभ्यासापेक्षा बाहेरच्या गोष्टींत जास्त रस आहे

# महाराष्ट्रातील पहिला सेमी कंडक्टर प्रकल्पाचे नवी मुंबईत उद्घाटन

## हे शासन उद्योगांना सर्वोतोपरी मदत करणारे- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**ठाणे – एक मराठी माणूस इलेक्ट्रॉनिक्स सेमिकंडक्टर प्रकल्प OSAT (Outsourced Semiconductor Assembly and Testing) उभा करण्याची क्रांती करतो, याचा मला अभिमान आहे. हे शासन उद्योगांना सर्वोतोपरी मदत करीत आहे आणि यापुढेही करीत राहील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल (बुधवारी) महापे एमआयडीसी येथे केले.**

ठाणे जिल्हातील महापे एमआयडीसी येथे मे.आर.आर.पी कंपनीच्या इलेक्ट्रॉनिक्स सेमिकंडक्टर प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी भारतरत्न सचिन तेंडुलकर, ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मभूषण डॉ.अनिल काकोडकर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.हर्षदीप कांबळे, विकास आयुक्त (उद्योग) दीपेंद्रसिंह कुशवाह, ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त कैलास शिंदे, मुंबई पोलीस दलाच्या फोर्स वन चे प्रमुख कृष्ण प्रकाश, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भांबरे, आरआरपी इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र चोडणकर आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, हे शासन दिलेला शब्द पाळणारे आहे. लाडकी बहीण योजना यशस्वी करुन दाखविली. इतर योजनाही यशस्वीपणे राबविल्या जात आहेत. विविध प्रकल्प पूर्णत्वास आणण्याच्या दृष्टीने जलद गतीने कामे सुरु आहेत. अटल सेतूमुळे मुंबई ते नवी मुंबई मधील दोन तासाचे अंतर आता अवघ्या २० मिनिटांवर आले आहे. महाराष्ट्रात बदल घडविणारे प्रकल्प आम्ही साकार करीत आहोत. उद्योग कधी दोन दिवसात येतही नाहीत किंवा दोन दिवसात जातही नाहीत. मात्र शासनाच्या सहकार्यामुळे उद्योग येतात. या शासनाने दाओस मध्ये पाच लाख करोडच्या उद्योग करारांवर सहया केल्या आहेत. लोकांच्या हातांना निश्चित काम मिळेल. इलेक्ट्रॉनिक्स सेमिकंडक्टर युनिटमध्ये ४०० लोकांना काम मिळणार आहे. या माध्यमातून अडॅव्हान्स टेक्नोलॉजी आपल्या राज्यात येत आहे. हे शासन सर्वांसाठी आहे. उद्योजकांना सबसीडी देण्यात येत आहे. उद्योजकांना कोणतीही अडचण आली तरी हे शासन त्यांची अडचण तातडीने दूर करते. हा उद्योग राज्याच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपली अर्थव्यवस्था अकरा क्रमांकावरुन पाचव्या क्रमांकावर आणली आहे. लवकरच आपली अर्थव्यवस्था तिसऱ्या क्रमांकावर आणण्याचे काम केले जात आहे. मोठे उद्योग महाराष्ट्रात आले आहेत, आणखी येत आहेत. हे शासन सदैव उद्योजकांच्याबरोबर, (पान २ वर)







**लोकांच्या हातांना निश्चित काम मिळणार...**

### आमच्याच मुख्यमंत्र्यांच्या हस्ते चीपचे अनावरण होईल – फडणवीस

सेमीकंडक्टर प्रकल्पातील चीप समर्पितचा कार्यक्रम २०२६ मध्ये होणार आहे. तेव्हा आमच्याच मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात आम्ही सत्तेत असणार आहोत, यात आमच्या मनात शंका नाही. परंतु तुमच्या मनात शंका असो किंवा नसो. तेव्हाच्या कार्यक्रमाची आगाऊ नोंदणी आताच करून ठेवा, असे विधान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. देवेंद्र फडणवीस यांची ही प्रतिक्रिया राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांना प्रत्युत्तरा दाखल होती. रोहित पवार यांनी आज सकाळी माध्यमांशी बोलताना म्हटले, हा प्रकल्प महायुती सुरू करत असली तरी निश्चितपणे राज्यातील महाविकास आघाडीचे पुढील सरकार हा प्रकल्प पूर्ण करेल.



### पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात भारत विश्वगुरू होण्याच्या मार्गावर– संदीप नाईक

नवी मुंबई – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवारी भाजप नवी मुंबई दक्षिण भारतीय सेलच्या माध्यमातून नवी मुंबई मनपा रुग्णालय, वाशी येथे रुग्णांना फळवाटप करण्यात आले. यावेळी माजी आमदार तथा नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी उपस्थिती दर्शवली. यावेळी भाजप दक्षिण भारतीय सेल नवी मुंबईचे अध्यक्ष शशी दामोदरन तसेच त्यांची संपूर्ण टीम उपस्थित होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात देश विश्वगुरू होण्याच्या मार्गावर आहे. भारताचा विकासाचा रथ अग्रेसर करणारे पंतप्रधान मोदी उत्तुंग व्यक्तिमत्त्व असल्याचे प्रतिपादन जिल्हाध्यक्ष नाईक यांनी यावेळी केले.

### ओम जयंती मंगला काली भद्रकाली कपालिनी । दुर्गा क्षमा शिवा धात्री स्वाहा नमो स्तुतो ।।





ठाणे --- धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रेरणेतून सुरू करण्यात आलेला नवरात्र उत्सव ठाण्यातील टेंभीनाका येथील जय अंबे माता सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळाच्या वतीने दरवर्षी मोठ्या श्रद्धेने साजरा करण्यात येतो. या नवरात्रोत्सवाकरता उभारण्यात येणाऱ्या माता दुर्गेश्वरी देवीच्या मंडपाचा मंडपपूजन सोहळा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी विधिवत मंडपपूजन करत दुर्गेश्वरी मातेचा जयघोष करून आवाहन करण्यात आले. यावेळी खासदार नरेश म्हस्के, माजी आमदार रवींद्र फाटक, आमदार संजय केळकर आदिसह मान्यवर उपस्थित होते. (छाया – मनोज सिंह)

## गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या...

गणेश उत्सव







वर्षा निवासस्थानी दहा दिवसांसाठी विराजमान झालेल्या श्री गणरायाचे भक्तीभावाने विसर्जन झाले. वाजत गाजत मोठ्या उत्साहात आरती करण्यात आली. त्यानंतर विसर्जन मिरवणूक काढून लाडक्या गणरायाला निरोप देण्यात आला. बंगल्याच्या आवारात तयार केलेल्या कृत्रिम तलावामध्ये श्री गणेशाचे विधिवत विसर्जन करण्यात आले. सर्वांना सुख, समाधान, भरभराट, आनंद दे आणि राज्यातील बळीराजाच्या वेदना दूर कर, अशी याचना मुख्यमंत्र्यांनी गणरायाला केली . यावर्षी वर्षावरील गणेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला यानिमित्ताने वर्षा बंगला सर्वसामान्यांसाठी खुला झाल्याचे समाधान वाटत असल्याचे मत मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केले. तसेच लाडक्या बहिणींच्या आशीर्वादाने आणि सर्वसामान्य लोकांसाठी केलेल्या कामाचे दान जनता आम्हाला नक्की देईल, असा विश्वास यावेळी एकनाथ शिंदे यांनी बोलून दाखवला.या विसर्जन सोहळ्याला मुख्यमंत्र्यांचे कुटुंबीय तसेच वर्षा बंगल्यावरील पोलीस आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## एक देश, एक निवडणुक संकल्पना कितपत व्यवहार्य ?

केंद्रीय मंत्रिमंडळाने दि. १८ सप्टेंबर रोजी एक देश एक निवडणूक प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. या मंजुरीनंतर हिवाळी अधिवेशनात हे विधेयक संसदेत मांडले जाणार असल्याची शक्यता आहे. परंतु एक देश एक निवडणूक प्रस्तावाच्या मंजुरीनंतर राजकारण तापले आहे. विरोधकांनी केंद्र सरकारवर एक देश एक निवडणुकीच्या प्रस्तावावरून टीका केली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी एक देश एक निवडणूक प्रस्तावावरून अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. तसेच निवडणुकांचे महत्व वाटत आहे तर या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकर घ्या, असे राज ठाकरे यांनी म्हटले आहे. एक देश, एक निवडणूक ही संकल्पना व्यवहार्य असू शकेल का याची शक्यता केंद्र सरकार पडताळून पाहणार आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहात या संकल्पनेला विरोधक कितपत पाठींबा मिळणार यावर ही संकल्पना काशी राबवायची हे ठरणार आहे. एक देश, एक निवडणूक या संकल्पनेला केंद्रीय मंत्रिमंडळाने नुकतीच मान्यता दिली. अजून याला संसदेची मान्यता लागणार आहे आणि देशातील प्रत्येक राज्याचे मत काय असणार हे विचारात घ्यावे लागणार आहे. या संकल्पनेमुळे राज्यांचे अधिकार, स्वायत्ततेला धक्का पोहचणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. एखाद्या राज्यात सरकार कोसळले किंवा तेथील विधानसभा बरखास्त झाली तर तिकडे आधी निवडणूक होणार काय, असा प्रश्न निर्माण होऊ शकतो. अशी परिस्थिती उद्भवल्यास त्या राज्याने लोकसभेचा कार्यकाळ संपेपर्यंत वाट पहायची? किंवा काही कारणांनी लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका लागल्या तर देशातील सर्व निवडणुका परत घेणार का? याचा खुलासा केंद्र सरकारने अजून केलेला नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांचा थेट संबंध सामान्य माणसांच्या जगण्याशी, त्यांच्या प्रश्नांशी असतो. त्याच्याच निवडणुका होत नसतील तर सामान्य माणसाने जायचे कोणाकडे? असा प्रश्न उपस्थित होणार आहे. त्यामुळे राज्यातल्या महापालिका, नगरपालिकांच्या निवडणुका घेणे आवश्यक ठरणार आहे. काही नगरपालिका, महापालिकांमध्ये ४ वर्षे प्रशासक कारभार सांभाळत आहेत, अशा वेळी स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक पुढे ढकलली तर लोकांचे प्रश्न प्रलंबित राहणार आहेत. अशा प्रकारे एक देश, एक निवडणूक संकल्पना राबवण्यात अनेक अडचणी येण्याची शक्यता आहे. भारताचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ समितीने एक देश, एक निवडणूक हा कार्यक्रम राबविण्यासंदर्भात एक अहवाल मार्च २०२४ रोजी केंद्राकडे दिला होता. त्यानंतर लोकसभेच्या निवडणुकीनंतर केंद्रात भाजपाचे सरकार सत्तेवर आले. सत्तेवर आल्यानंतर १०० दिवस झाल्यावर केंद्र सरकारने मंत्रिमंडळ बैठकीत या अहवालावर शिक्कामोर्तब केले. पंतप्रधान मोदी यांचा दुसरा कार्यकाळ संपत असताना २ सप्टेंबर २०२३ रोजी कोविंद समिती नेमण्यात आली होती. तिने या विषयावर १९१ दिवस काम केले आणि १४ मार्च २०२४ रोजी १८,६२६ पानांचा अहवाल सादर केला. या समितीच्या सदस्यांमध्ये वेगवेगळी पार्श्वभूमी असलेल्या वेगवेगळ्या प्रतिष्ठित व्यक्ती होत्या. राजकीय पक्ष, निवृत्त सरन्यायाधीश, माजी मुख्य निवडणूक आयुक्त आणि राज्य निवडणूक आयुक्त, कायदेतज्ज्ञ अशा सगळ्यांकडून या समितीने सूचना मागवल्या. जनतेकडूनही सूचना मागविण्यात आल्या होत्या. बार कौन्सिल ऑफ इंडिया, कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री, फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री अशा सगळ्यांना त्यांचे मत मांडण्याची संधी देण्यात आली होती. कोविंद समितीने देशात एकाच वेळी निवडणुका व्हाव्यात, असे एकमुखी मत देऊन त्यासाठी संविधान आणि संबंधित कायद्यांमध्ये आवश्यक दुरुस्त्या सुचवल्या आहेत. सदर समितीने संविधानात ८२ अ हा एक नवीन अनुच्छेद सुचवला आहे. हा अनुच्छेद असे सांगतो की, कलम ८३ आणि १७२ मध्ये काहीही असले तरी, नियुक्त तारखेनंतर होणाऱ्या कोणत्याही सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी स्थापन झालेल्या सर्व विधानसभांची पूर्ण मुदत संपुष्टात येईल. समितीने हे स्पष्ट केले आहे की, सर्व देशभर एकाचवेळी निवडणुका (पंचायत निवडणुका वगळून ) लोकसभा आणि सर्व विधानसभेच्या एकत्रित निवडणुकांचा समावेश असेल. लोकसभेनंतर शंभर दिवसांत, पंचायतीच्या निवडणुकांचा प्रस्ताव आहे. जेथे कोणत्याही राज्याची विधानसभा अविश्वास प्रस्ताव, त्रिशंकू सदन किंवा इतर कोणत्याही कारणामुळे बरखास्त झालेली असेल, अशा सभागृहासाठी त्यांचा कार्यकाळ लोकसभेबरोबरच संपेल या बेताने नव्याने निवडणुका घेतल्या जातील. प्रशासकीय खर्च तसेच सततच्या आचारसंहितेमुळे विकासकामांमध्ये अडथळा येत असल्याचा युक्तिवाद केंद्र सरकारने करत देशभरात विधानसभा आणि लोकसभा निवडणुका एकाच वेळी घेण्याचा मुद्दा मांडला जात आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत ५५ हजार कोटींचा खर्च आल्याचा अंदाज आहे. परंतु एकाच वेळी अनेक निवडणुकांची अंमलबजावणी सोपी नाही. त्यासाठी राज्यांची संमती तसेच घटनेत दुरुस्ती करावी लागेल. सर्व राजकीय पक्षांची संमती गरजेची आहे. भाजपच्या २०१४ मधील निवडणूक जाहीरनाम्यात एक देश, एक निवडणूक हे आश्वासन देण्यात आले होते. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाषणात या वचनाचा उल्लेख अनेक वेळा केलेला दिसतो. देशातील अनेक राजकीय पक्ष यासाठी तयार नाहीत. त्यामुळे याची अंमलबजावणी सोपी नाही. विधि आयोगाने २०१८ मध्ये अशा निवडणुकांची शिफारस केली होती. यामध्ये एकत्रित निवडणूक घेण्याबाबत विविध पर्याय सुचविण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी विविध राजकीय पक्षांशी चर्चा केली होती. त्यावेळी पाठिंबा दिलेले पक्ष आता कोणती भूमिका घेणार हा प्रश्न आहे. एकत्रित निवडणुकांसाठी २५ लाख मतदान यंत्रे लागतील. परंतु सध्या १२ लाख मतदान यंत्रे आहेत हे वास्तव आहे. संसदेच्या स्थायी समितीने दक्षिण आफ्रिका तसेच स्वीडनमधील दाखले दिले. तेथे देशाची तसेच प्रांतिक सरकारे तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकाच वेळी होतात. परंतु भारतात एक देश, एक निवडणूक ही संकल्पना राबवण्यापूर्वी अनेक अडचणींचा सामना केंद्र सरकारला करावा लागणार आहे हे नक्की.

## स्वप्नातील घर साकार होणार; प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा एक व टप्पा दोन अंतर्गत गृहप्रवेश चावी वाटपाचा कार्यक्रम व मंजुरी पत्रक वितरण

**ठाणे – प्रधानमंत्री आवास योजना–ग्रामीण टप्पा–२ अंतर्गत सन २०२४–२५ मधील मंजूर लाभार्थ्यांना मंजूरी पत्रांचे वितरण आज जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालय, नियोजन भवन, ठाणे येथे प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा–२ अंतर्गत सन २०२४–२५ मधील जिल्ह्यातील १४ मंजूर लाभार्थ्यांना प्रतिनिधिक स्वरूपात घरकुल मंजूर पत्रक वितरण वितरण करण्यात आले तसेच प्रधानमंत्री आवास योजना टप्पा एक अंतर्गत पूर्ण झालेल्या घरकुल दोन लाभार्थ्यांना गृहप्रवेशाची चावी व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रधानमंत्री आवास योजना शहरी अंतर्गत तीन लाभार्थी यांना जिल्हाधिकारी यांच्या हस्ते गृहप्रवेशाची चावी देण्यात आली.**



प्रधानमंत्री आवास योजना–ग्रामीण टप्पा–१ अंतर्गत सन २०२३–२४ व २०२४–२५ मध्ये आतापर्यंत पूर्ण झालेल्या दोन घरकुलांचे गृहप्रवेश करण्यात आले असून प्रशस्तीपत्र देऊन लाभार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी यांनी घरकुल बांधकाम करताना येणाऱ्या अडचणींवर चर्चा केली. ग्रामीण भागातील ग्रामस्थांचे घरकुल वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असणे आवश्यक आहे असे प्रतिपादन मार्गदर्शन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी केले. ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागासाठी प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा–२ प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत २४–२५ करिता ७ हजार १४१ उद्दिष्ट प्राप्त झाले आहे त्यापैकी सद्यस्थितीला ३ हजार ५५६ लाभार्थींना मंजुरी देण्यात आली असून २ हजार ६०१ पहिला हप्ता वितरण करण्यासाठी FTO जनरेट करण्यात आलेले आहेत अशी माहिती प्रास्ताविक करताना प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा ठाणे छायादेवी शिसोदे यांनी माहिती दिली.

यावेळी आयुक्त नगरपरिषद संचालनालय, नवी मुंबई मनोज रानडे, निवासी उपजिल्हाधिकारी ठाणे संदीप माने, उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन हरीश पाटील, मुख्याधिकारी कुळगाव बदलापूर मारुती गायकवाड, अतिरिक्त मुख्य अधिकारी अंबरनाथ अभिषेक पराडकर, सर्व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभारी सहायक प्रकल्प संचालक संतोष पांडे यांनी केले.



## प्रबोधनकार ठाकरे यांना जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

केशव सिताराम उपाख्य प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून आज जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन करण्यात आले. नगरपालिका प्रशासन सह आयुक्त श्रीनिपुते यांच्या हस्ते प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील मारुती गायकवाड व इतर कर्मचारी उपस्थित होते.




## प्रबोधनकार ठाकरे जयंतीदिनी नमुंमपा मुख्यालयात अभिवादन

थोर समाजसुधारक केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात एम्फिथिएटर येथे प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार यांच्या शुभहस्ते इतर अधिकारी – कर्मचारी यांच्या उपस्थितीत प्रतिमापूजन संपन्न झाले.



## महापालिका मुख्यालयात प्रबोधनकार ठाकरे जयंती निमित्ताने अभिवादन

पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात काल दिनांक १७ सप्टेंबर रोजी प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त प्रसेनजीत कारलेकर, उपायुक्त रवीकिरण घोडके, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, लेखा अधिकारी संग्राम व्होरकाटे , उपअभियंता विलास चव्हाण, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



ठाणे महापालिकेच्यावतीने, केशव सिताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीच्या निमित्ताने, महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर, संदीप झिनवाल यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

## गाडीच्या नुकसानीवरून वाद– टोळक्याने केली हॉटेल मॅनेजरला मारहाण– तिघे अटकेत

ठाणे – ठाण्याच्या वसंत विहार परिसरात असलेल्या हॉटेल फाईन डाईंन हॉटेलमध्ये आलेल्या ग्राहकाच्या गाडीचे नुकसान झाल्याच्या कारणावरून झालेल्या वादात गाडीमालक यांने आपले मित्र बोलावून ७ ते ८ जणांनी हॉटेलच्या मॅनेजरला काउंटरवरून खेचून मारहाण केली. सदरचा प्रकार मंगळवारी (ता–१७ सप्टें) रोजी रात्रीच्या १ वाजता या प्रकरणी चितळसर पोलीस ठाण्यात आरोपी जतिन जयवंत कदम, विनायक देवकर व रोशन यादव आणि त्यांचे इतर साथीदार याच्या विरोधात मारहाणीचा आणि तोडफोडीचा गुन्हा दाखल केला आहे. चितळसर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## हे शासन उद्योगांना सर्वोतोपरी मदत करणारे– मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

(पान १ वरून) त्यांच्या पाठीशी उभे आहे. शेतकऱ्याला केंद्र बिंदू मानून हे शासन काम करीत आहे. केंद्र शासनाकडून महाराष्ट्र राज्याला चांगले सहकार्य लाभत आहे.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सेमिकंडक्टर हा भारतातला पहिला प्रकल्प आपल्या महाराष्ट्रामध्ये सुरु होत आहे, याचा सर्वांना अभिमान वाटत आहे. एका मराठी माणसाने या ठिकाणी भारतामध्ये पहिल्यांदा हा प्रकल्प सुरु केला. सुरुवात करणारा महत्वाचा असतो. आपण आपला भारत देश सामर्थशाली घडविण्यासाठी प्रयत्नशील आहोत, त्यासाठी ही चिप खूप महत्वाची आहे. आम्ही डिझाईनच्या क्षेत्रात पुढे गेलो. पण जे रियल हार्डवेअर आहे, त्याच्यामध्ये मात्र कुठेतरी कमतरता भासत होती. आणि विशेषत: भारतासारख्या देशाला आणि जगालाही कोविडच्या काळात हे लक्षात आले की, ग्लोबल सप्लायर चैन खंडित झाली. चीन, जपान यांच्याकडे सगळ्या प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक चिप्स आणि तत्सम गोष्टी या त्यांच्याच देशातून येतात. जगातील बहुतांश देश त्यांच्यावरच अवलंबून होते. त्यामुळे ही सिस्टिम डिस्टर्ब झाली. सेमिकंडक्टर क्षेत्रामध्ये भारताला पुढे जावेच लागेल. आपल्या देशाला जर जगामध्ये एक विकसित राष्ट्र म्हणून प्रस्थापित व्हायचे असेल आणि जगाच्या संपूर्ण व्यवस्थेचा भाग व्हायचे असेल तर आपल्या देशात हा उद्योग नियोजनबध्दरित्या वाढवावा लागेल. मला या गोष्टीचा आनंद आहे की, सेमिकंडक्टर क्षेत्रामध्ये आपले स्वत:चे धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. हे सगळ्यात महत्त्वाचे आहे. आज आपण पाहतोय की, ज्या प्रकारे डिजिटायझेशन झपाट्याने वाढत आहे, त्याच प्रकारे इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल इकोसिस्टिम आपल्या संपूर्ण जीवनाला बदलते आहे. उद्योग क्षेत्रातील येणारा काळ हा भारतासाठी उज्वल असणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या भाषणात म्हणाले की, सेमिकंडक्टर प्रकल्पामुळे महाराष्ट्र राज्यातील उद्योगाला गती मिळणार आहे. महाराष्ट्रासाठी हे महत्वाचे पाऊल ठरणार आहे. डिजिटल क्रांतीला गती मिळणार आहे. इच्छा शक्तीच्या जोरावर हा प्रकल्प उभा राहिला आहे. महाराष्ट्राला उद्योगाची परंपरा आहे. राज्याच्या विकासाचा नवीन अध्याय सुरू झाला आहे. हा प्रकल्प औद्योगिक विकासासाठी महत्वाचा असणार आहे. उद्योग क्षेत्राला गती देण्याचे निर्णय सरकारने घेतले आहेत. उद्योगाचे विकेंद्रीकरण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. उद्योगासाठी अनेक प्रकारच्या सवलती देण्यात आल्या आहेत. या प्रकल्पामध्ये १२ हजार कोटींची गुंतवणूक करण्यात आली आहे. महाराष्ट्राची घोडदौड अशीच सुरु राहणार आहे.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रास्तावित करताना आरआरपी इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र चोडणकर यांनी या प्रकल्पाविषयी विस्तृत माहिती उपस्थितांना दिली. यावेळी भारतरत्न सचिन तेंडुलकर, जेष्ठ शास्त्रज्ञ पद्मभूषण डॉ.अनिल काकोडकर यांनीही आपले मनोगत व्यक्त करुन या प्रकल्पाला शुभेच्छा दिल्या आणि असे प्रकल्प यशस्वी करण्यासाठी कायम सहकार्य करण्याची हमी दिली.

या कार्यक्रमासाठी विविध उद्योग क्षेत्रातील नामवंत उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

विद्युत विभाग
प्रथम मुदतवाढ

निविदा सूचना क्रमांक : ठा.म.पा./विद्युत/नि.सू./ २१ /२०२४-२५

ठा.म.पा./पी.आर.ओ./जाहिरात/३७०/२०२४-२५ दि.२६/०८/२०२४ अन्वये ठाणे महानगरपालिका मुख्य प्रशासकीय इमारती मधील उद्वाहनाची वार्षिक निगा, देखभाल व दुरुस्ती करणे कामी प्रथम मुदतवाढ निविदा निविदा इ टेंडरींग पध्दतीने दिनांक १८/०९/२०२४ ते दि २५/०९/२०२४ या कालावधीत मागविण्यात येत आहे.निविदा इ टेंडरींग पध्दतीने https://mahatenders.gov.in वर दि. २५/०९/२०२४ पर्यत दुपारी ३.०० या वेळेत स्विकारण्यात येतील व निविदा दि. २५/०९/२०२४ रोजी दुपारी ३.३० या वेळेत उघडण्यात येतील. निविदेतील इतर अटी शर्थी मूळ निविदा सुचना प्रमाणे राहतील.

ठामपा/पिआरओ/विद्युत-मु/४९०/२०२४-२५
दि: १३.०९.२०२४

**सही/-**
उपनगर अभियंता (विद्युत)
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**Pls visit our oficial web-site www.thanecity.gov.in**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय पनवेल**
**जूना ठाना नाका साई नगर, ता. पनवेल, जि. रायगड– ४१०२०६**
**दुरध्वनी क्र. / फॅक्स क्र. ०२२–२७४५२३९९. ई–मेल:– tahasilpanvel@gmail.com**

पत्र क्र. मशा/प्रशा–१/ उशिरा मृत्यू नोंद नोटीस / २०२४/११८/२०२४ दि. ९/७/२०२४

**नोटीस**

विषय:– उशिरा मृत्यू नोंद करणेबाबत.

संदर्भ :– अर्जदार श्री. अमित विजय देशपांडे, रा.ए/१०१. ओम शिव समर्थ. हेंद्रया कॉम्प्लेक्स, चिंचोली पाडा, डोंबीवली वेस्ट, कल्याण, ठाणे यांचा दि. १९/०४/२०२४ रोजीचा अर्ज.

उपरोक्त विषयाकामी अर्जदार श्री. अमित विजय देशपांडे, रा.ए/१०१, ओम शिव समर्थ, हेंद्रया कॉम्प्लेक्स, चिंचोली पाडा, डोंबिवली वेस्ट, कल्याण, ठाणे यांनी कै. विजय श्रीराम देशपांडे यांची उशिरा मृत्यू नोंदीचा आदेश मिळणेकामी कार्यकारी दंडाधिकारी ता. पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.
प्रकरणी सदर अर्जाकामी दिनांक २०/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता या कार्यालयाकडे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. सबब सदर मृत्यू नोंदीस आपली हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात कार्यकारी दंडाधिकारी पनवेल यांचेकडे सुनावणी पुर्वी सादर करावी. सुनावणी नंतर हरकत प्राप्त झाल्यास मान्य करण्यात येणार नाही. हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काहीएक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित येईल याची नोंद घ्यावी.

सही/–
(संभाजी शेलार)
निवासी नायब तहसलिदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी पनवेल

**नवी मुंबई महानगरपालिका**

**अभियांत्रिकी विभाग**

**निविदा सुचना क्र. नमुंमपा/का.अ.(म.व्य.)/06/2024-2025**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (रू.) |
|---|---|---|
| 1 | तुर्भे विभागातील सानपाडा से.-1 ब्रिजलगत जवळील शौचालयास केअर टेकर रुम पुरविणे व बसविणे. | रु.3,75,249/- |
| 2 | तुर्भे विभागातील सेक्टर-19 माथाडी चौकातील नमुंमपा शौचालयासाठी केअर टेकर रुम पुरविणे व बसविणे. | रु.3,48,600/- |
| 3 | तुर्भे विभागातील ऑईल टाकी समोरील शौचालयास केअर टेकर रुम पुरविणे व बसविणे. | रु.3,75,249/- |
| 4 | वाशी विभागातील सेक्टर-1 सुभाषचंद्र बोस मैदान येथील शौचालयाकरीता मलवाहिनी टाकणे. | रु.3,13,507/- |
| 5 | घणसोली विभागातील सेक्टर-5 येथील मलउदंचन केंद्र येथे पंप बसविणे व इतर अनुषंगीक कामे करणे. | रु.20,79,650/- |
| 6 | ऐरोली विभागातील ऐरोली गावातील मढवी हाऊस ते जरीमरी अर्पा. येथे नवीन मलनिस्सारण वाहिनी टाकणे. | रु.9,09,306/- |
| 7 | ऐरोली विभागातील से.3 मधील H Group अंतर्गत गल्ल्यांमधील मलवाहिन्यांची Looping करणे | रु.19,93,132/- |
| 8 | ऐरोली विभागातील देशमुखवाडी येथील रुम नं.1911 ते रुम नं.1947 व रुम नं.1941 ते रुम नं.1844 लगतच्या परिसरातील मलवाहिन्या बदलणे | रु.20,31,166/- |
| 9 | नेरूळ सेक्टर 11 मधील संगम अपार्टमेंट ते नेरूळ केमिस्ट पर्यंत मलनिसारण वाहिनी टाकणे | रु.5,19,912/- |
| 10 | तुर्भे विभागातील सेक्टर-5 येथील शाळेजवळील मैदानामध्ये नवीन शौचालय बांधणे. | रु.14,32,894/- |

**या निविदेबाबतची विस्तृत माहिती नवी मुंबई महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in यावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. संबंधीत निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.**

सही/-
**कार्यकारी अभियंता (म.व्य.)**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**जा.क्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/396/2024**

## भारतीय रेल्वे

### महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

- पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
- शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
- वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
- नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
- फी : फी नाही.
- Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
- अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/




- पदाचे नाव :
१ डायटीशियन
२ नर्सिंग सुपरिटेंडेंट
३ ऑडिओलॉजिस्ट स्पीच थेरेपिस्ट
४ क्लिनिकल सायकोलॉजिस्ट
५ डेंटल हाइजीनिस्ट
६ डायलिसिस टेक्निशियन
७ हेल्थ मलेरिया इंस्पेक्टर ग्रेड III
८ लॅब सुपरिटेंडेंट ग्रेड III
९ पर्फ्युजनिस्ट
१० फिजियोथेरेपिस्ट ग्रेड II
११ ऑक्यूपेशनल थेरेपिस्ट
१२ कॅथ लॅब टेक्निशियन
१३ फार्मासिस्ट
१४ रेडिओग्राफर एक्स-रे टेक्निशियन
१५ स्पीच थेरपिस्ट
१६ कार्डियाक टेक्निशियन
१७ ऑप्टोमेट्रिस्ट
१८ ECG टेक्निशियन
१९ लॅब असिस्टंट ग्रेड II
२० फील्ड वर्कर
- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: B.Sc + डायटीशियन PG डिप्लोमा किंवा B.Sc (Home Science) + M.Sc Home Science (Food and Nutrition)
पद क्र.२: GNM² किंवा B.Sc (Nursing)
पद क्र.३: B-SLP
पद क्र.४: पदव्युत्तर पदवी (Clinical Psychology / Social Psychology)
पद क्र.५: (i) B.Sc (Biology) (ii) डेंटल हाइजीन डिप्लोमा (iii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.६: B.Sc.+डिप्लोमा (Haemodialysis) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) B.Sc.(Chemistry) (ii) हेल्थ / सॅनिटरी इंस्पेक्टर डिप्लोमा किंवा NTC (Health Sanitary Inspector)
पद क्र.८: B.Sc (Bio-Chemistry / Micro Biology / Life science)+DMLT किंवा B.Sc (Medical Technology)
पद क्र.९: B.Sc + डिप्लोमा (Perfusion Technology) किंवा B.Sc + ०३ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) फिजिओथेरेपी पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.११: (i) १२वी उत्तीर्ण (ii) ऑक्यूपेशनल थेरेपी डिप्लोमा/पदवी
पद क्र.१२: B.Sc+ डिप्लोमा (Cardiac Professional Cath Lab work) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१३: १२वी उत्तीर्ण+D.Pharm किंवा B.Pharma
पद क्र.१४: १२वी उत्तीर्ण (PhysicsChemistry) (ii) डिप्लोमा (Radiography/ X Ray Technician/ Radiodiagnosis Technology)
पद क्र.१५: (i) B.Sc (ii) डिप्लोमा (Audio and Speech Therapy) (iii) २ वर्षे अनुभव
पद क्र.१६: १२वी (Science) उत्तीर्ण किंवा डिप्लोमा (Cardiology Lab)
पद क्र.१७: B.Sc (Optometry) किंवा (Ophthalmic Technician)
पद क्र.१८: (i) १२वी उत्तीर्ण /B.Sc (ii) डिप्लोमा/पदवी (ECG Laboratory Technology / Cardiology /Cardiology Technician / Cardiology Techniques )
पद क्र.१९: (i) १२वी उत्तीर्ण (ii) DMLT
पद क्र.२०: १२वी उत्तीर्ण (Biology/ Chemistry)

- वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१,४,५,७,८,१०, ११, १२, १५ ते १९: १८ ते ३६ वर्षे
पद क्र.२: २० ते ४३ वर्षे
पद क्र.३: २१ ते ३३ वर्षे
पद क्र.६: २० ते ३६ वर्षे
पद क्र.९: २१ ते ४३ वर्षे
पद क्र.१३: २० ते ३८ वर्षे
पद क्र.१४: १९ ते ३६ वर्षे
पद क्र.२०: १८ ते ३३ वर्षे
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
- Fee: General/OBC/EWS: ५००/- SC/ST/ExSM²/ /EBC/महिला: २५०/-
- Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४
- परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
- अधिकृत संकेतस्थळ https://indianrailways.gov.in/

### एसएससीमार्फत जीडी कॉन्स्टेबल पद

- पदाचे नाव:
१ GD कॉन्स्टेबल (जनरल ड्युटी)
- अ. क्र.
१ Border Security Force (BSF)
२ Central Industrial Security Force (CISF)
३ Central Reserve Police Force (CRPF)
४ Sashastra Seema Bal (SSB)
५ Indo-Tibetan Border Police (ITBP)
६ Assam Rifles (AR)
७ Secretariat Security Force (SSF)
८ Narcotics Control Bureau (NCB)
Total ३९४८१
- शैक्षणिक पात्रता: १०वी उत्तीर्ण.
- शारीरिक पात्रता:
पुरुष/महिला प्रवर्ग उंची (सेमी) छाती (सेमी)
पुरुष, SC OBC १७० ८०/ ५
ST १६२.५ ७६/ ५
महिला Gen, SC OBC १५७ N/-
ST १५० N/-
वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी १८ ते २३ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
- नोकरी ठिकाण : संपूर्ण भारत
Fee: General/OBC: १००/- SC/ST/ExSM²/महिला : फी नाही
महत्त्वाच्या तारखा :
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १० ऑक्टोबर २०२४
- परीक्षा : जानेवारी/फेब्रुवारी २०२५
- संकेतस्थळ https://ssc.gov.in/

### भारतीय अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकर

- पद क्र. असिस्टंट डायरेक्टर, असिस्टंट हायड्रोग्राफिक सर्व्हेअर, परवाना इंजिन ड्रायव्हर, ज्युनियर अकाउंट्स ऑफिसर, ड्रेज कंट्रोल ऑपरेटर, स्टोअर कीपर, मास्टर 2nd क्लास, स्टाफ कार ड्रायव्हर, मास्टर ३ीव क्लास, मल्टी टास्किंग स्टाफ टेक्निकल असिस्टंट (
- शैक्षणिक पात्रता: पद क्र.१: इंजिनिअरिंग पदवी (Civil / Mechanical)
पद क्र.२: (i) सिव्हिल इंजिनिअरिंग पदवी (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) १०वी उत्तीर्ण (ii) इंजिन ड्रायव्हर परवाना
पद क्र.४: B.Com + ०३ वर्षे अनुभव किंवा B.Com+Inter ICW-/Inter C-.
पद क्र.५: (i) १०वी उत्तीर्ण +१० वर्षांसह अनुभवसह प्रथम श्रेणी चालक म्हणून योग्यतेचे प्रमाणपत्र किंवा मेकॅनिकल इंजिनिअरिंग डिप्लोमा +०१ वर्षे अनुभव (ii) पोहण्याचे ज्ञान.
पद क्र.६: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ०५ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) मास्टर २पव क्लास प्रमाणपत्र (ii) पोहण्याचे ज्ञान.
पद क्र.८: (i) १०वी उत्तीर्ण (ii) वाहन चालक परवाना (iii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.९: (i) मास्टर ३ीव क्लास प्रमाणपत्र (ii) पोहण्याचे ज्ञान.
पद क्र.१०: १०वी उत्तीर्ण
पद क्र.११: पदवी (Civil / Mechanical/ Marine Engineering /Naval Architecture) किंवा इंजिनिअरिंग डिप्लोमा (Civil / Mechanical / Marine Engineering / Naval Architecture)+ ०३ वर्षे अनुभव
- वयाची अट: १५ सप्टेंबर २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१, २, ७: ३५ वर्षांपर्यंत
पद क्र.३, ४, ५, ८, ९ ११: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.६: २५ वर्षांपर्यंत
पद क्र.१०: १८ ते २५ वर्षे
- Fee: General/OBC: 500/- SC/ST/EWS/PWD:200/-
अर्ज करण्याची शेवटची तारीख: २१ सप्टेंबर २०२४

### महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

- पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
- शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
- वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
- नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
- फी : फी नाही.
- Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
- अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/

## कोकण रेल्वे

- पदाचे नाव
सिनियर सेक्शन इंजिनिअर (Civil) ०५
२ सिनियर सेक्शन इंजिनिअर (Electrical) ०५
३ स्टेशन मास्टर १०
४ कमर्शियल सुपरवाइजर ०५
५ गुड्स ट्रेन मॅनेजर ०५
६ टेक्निशियन III (Mechanical) २०
७ टेक्निशियन III (Electrical) १५
८ ESTM-III (ST) १५
९ असिस्टंट लोको पायलट १५
१० पॉइंट्स मन ६०
११ ट्रॅक मेंटेनर-IV ३५
- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: इंजिनिअरिंग पदवी (Civil)
पद क्र.२: इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical / Electronics)
पद क्र.३: कोणत्याही शाखेतील पदवी
पद क्र.४: कोणत्याही शाखेतील पदवी
पद क्र.५: कोणत्याही शाखेतील पदवी
पद क्र.६: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Fitter / Mechanic Diesel / Mechanic (Repair and Maintenance of Heavy Vehicles) /Mechanic Automobile (Advanced Diesel Engine) / Mechanic (Motor Vehicle)/ Tractor Mechanic /Welder / Painter)
पद क्र.७: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Electrician/ Wireman/Mechanic )
पद क्र.८: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Electrician / Electronics Mechanic / Wireman) किंवा १२वी उत्तीर्ण (Physics Maths)
पद क्र.९: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI (Armature and Coil Winder / Electrician / Electronics Mechanic / Fitter /Heat Engine / Instrument Mechanic / Machinist / Mechanic Diesel / Mechanic (Motor Vehicle) / Millwright Maintenance Mechanic / Mechanic Radio TV / Refrigeration and Air-conditioning Mechanic / Tractor Mechanic / Turner / Wireman) किंवा इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics / -utomobile)
पद क्र.१०: १०वी उत्तीर्ण
पद क्र.११: १०वी उत्तीर्ण
- वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते ३६ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
- नोकरी ठिकाण: कोकण रेल्वे
- फी : ५९/-
- Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०६ ऑक्टोबर २०२४
अधिकृत संकेतस्थळ
- https://konkanrailway.com/

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ‘स्वच्छता ही सेवा’ या अभियानाचा शुभारंभ

ठाणे १८ : ठाणे महानगरपालिकेच्या ‘स्वच्छता ही सेवा’ या अभियानाचा शुभारंभ मंगळवारी (१७ सप्टेंबर) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पारसिक रेतीबंदर विसर्जन घाट येथे करण्यात आला. यावेळी पारसिक घाटावर उपस्थित असलेल्या नागरिकांना आरोग्यासाठी स्वच्छता महत्वाची असून प्रत्येकांनी स्वच्छतेबाबत जागरुक राहण्याचे आवाहन करीत मुख्यमंत्र्यांनी सर्वांना स्वच्छतेची प्रतिज्ञा दिली.

यावेळी खासदार नरेश म्हस्के, महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिकत आयुक्त १ संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे, उपायुकत मनिष जोशी, शंकर पाटोळे, वैद्यकीय अधिकारी राणी शिंदे, कार्यकारी अभियंता सुधीर गायकवाड यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.





मी स्वत: स्वच्छतेच्या बाबतीत जागरुक राहीन, मी स्वत: कुठेही कचरा फेकणार नाही व दुसऱ्यालाही फेकू देणार नाही, त्याचबरोबर स्वच्छ भारत मिशनमधील माझा सहभाग म्हणून माझ्या घरात, माझ्या दुकानात, कामाच्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे वर्गीकरण करुन ओला कचरा हा हिरव्या कचरा पेटीत व सुका कचरा हा निळ्या कचरा पेटीत टाकीन आणि घरगुती घातक कचरा लाल कचरा कुंडीतच टाकेन तसेच प्लास्टिक व थर्माकोलच्या वापराला प्रतिबंध करुन माझे ठाणे शहर, पर्यायाने माझे राष्ट्र, माझा देश प्लास्टीक व थर्माकोल मुक्त होण्यासाठी मी सदैव कटिबद्ध राहीन अशी शपथ देवून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ‘स्वच्छता ही सेवा’ या अभियानाचा शुभारंभ केला.

या अभियानाच्या काळात शहरात जनजागृतीपासून प्रत्यक्ष सफाईपर्यंत उपक्रम संपूर्ण शहरात आयोजित केले जाणार आहेत. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते एक पेड माँ के नाम यासाठी नागरिकांना रोपे आणि कंपोस्ट खताचे वाटप करण्यात आले.

स्वच्छता ही सेवा हे अभियान १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर पर्यंत देशभरात मोठ्या उत्साहात साजरे जाणार आहे. या अभियानातंर्गत 'एक पेड मा के नाम', ‘स्वच्छता कर्मचारी, लाडकी बहीण योजना आणि हरित ठाणेचे प्रतिनिधित्व करणारे सेल्फी पॉइंट उभारण्यात येणार आहेत. तसेच या अभियानातंर्गत शहरात अनेक ठिकाणी क्लीन ड्राईव्ह घेण्यात येणार आहेत. तसेच स्वच्छता अभियान केवळ २ ऑक्टोबरपर्यंत मर्यादित राहणार नाही तर त्यानंतरही ते सुरू राहणार असून नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती केली जाणार आहे.

# स्वच्छ भारत मिशन या उपक्रमामध्ये हिरीहिरीने सहभाग घेऊन आपले शहर , आपला परिसर स्वच्छ करण्यासाठी तुम्ही, आम्ही सर्वांनी एकत्रपणे प्रयत्न करूया !

डोंबिवली - स्वच्छ भारत मिशन या उपक्रमामध्ये हिरीहिरीने सहभाग घेऊन आपले शहर , आपला परिसर स्वच्छ करण्यासाठी तुम्ही, आम्ही सर्वांनी एकत्रपणे प्रयत्न करूया असे प्रतिपादन मा.मंत्री रविंद्र चव्हाण यांनी आज केले. शासनाच्या निर्दे शानुसार महापालिका क्षेत्रात स्वच्छता पंधरवडा दि.१८ नोव्हेंबर २०२४ ते ०२ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने या स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ डोंबिवली(प.) येथील कुंभारखाण पाडा येथील खाडी परिसरात करण्यात आला त्यावेळी बोलतांना त्यांनी हे प्रतिपादन केले, या वेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड , माजी पालिका सदस्य विकास म्हात्रे, उपायुक्त अतुल पाटील, विजयकुमार द्वासे तसेच इतर अधिकारी/कर्मचारी वर्ग, NSS चे विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते. यावेळी सर्व उपस्थितांच्या वतीने स्वच्छतेची शपथ घेण्यात येवून स्वच्छतेबाबत पथनाट्याचे सादरीकरणही करण्यात आले.



पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत मिशनच्या माध्यमातून संपूर्ण देशभरामध्ये एक जनजागृतीचा उपक्रम २०१४ पासून सुरू केला आहे आणि त्याच उपक्रमाचा भाग म्हणून हे स्वच्छता अभियान सर्वत्र राबविले जात आहे. या वर्षी अनंत चतुर्दशीनंतर संपूर्ण शहरातील गणेशघाट तसेच परीसरातील संपूर्ण स्वच्छता व्हावी, म्हणून कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने आजपासून हे स्वच्छता अभियान राबविण्याचे ठरविले आहे असे सांगत मा.मंत्री रविंद्र चव्हाण यांनी या अभियानाबाबत महानगरपालिकेच्या सर्व अधिकारी वर्ग, कर्मचारी त्याचप्रमाणे स्वच्छता दूत यांस धन्यवाद दिले.

यावेळी मंत्री रविंद्र चव्हाण, महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड इतर अधिकारी वर्ग तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी यांच्यमार्फत कुंभारखानपाडा गणेशघाट परिसरात साफसफाई मोहिम राबविण्यात आली आणि स्वच्छता अभियानतंर्गत एक पेड माँ के नाम या उपक्रमांत देशी प्रजातीच्या झाडाची लागवड मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आली.

कल्याण मधील या अभियानाचा प्रारंभ आज कल्याण (पश्चिम) येथील दुर्गाडी गणेश घाट येथे महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वच्छतेची शपथ घेवून झाला. या स्वच्छता अभियानाच्या अनुषंगाने आपण सर्व गणेश घाटांवर साफसफाईची मोहिम सुरु केली आहे, स्वच्छतेबाबत लोकांमध्ये अधिकाधिक जनजागृती व्हावी यासाठी स्वच्छता ही सेवा या उपक्रमात, या पंधरवडयात महापालिकेने अनेक उपक्रमांचे आयोजन केले आहे, आज उपस्थित असलेल्या एनएसएसच्या, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्यामार्फतच स्वच्छतेची चळवळ घराघरात पोहोचवायची आहे ,यामध्ये सर्वांनी आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड यांनी यावेळी केले.

सदर दोन्ही ठिकाणी कार्यक्रमाचे प्रास्ताविक घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील यांनी केले. यासमयी महापालिकेचे स्वच्छता अभियानाचे ब्रँड अँम्बेसिडर डॉ.प्रशांत पाटील, महापालिकेचे अति.आयुक्त हर्षल गायकवाड, उपायुक्त डॉ. विजयकुमार द्वासे तसेच इतर अधिकारी/कर्मचारी वर्ग उपस्थित होता.




# राहनाळ येथील जिल्हा परिषद शाळेत टोरेंट पॉवरच्या माध्यमातून मुलांमध्ये विद्युत सुरक्षा आणि ऊर्जा संवर्धन जागृती

भिवंडी: सुरक्षितता आणि विजेबद्दल जागरूकता वाढवण्याच्या उद्देशाने एका महत्त्वपूर्ण उपक्रमात, टोरेंट पॉवर लिमिटेड, भिवंडी यांनी शुक्रवारी राहनाल येथील झेडपी स्कूलमध्ये सर्वसमावेशक सुरक्षा जागरूकता सत्राचे आयोजन केले. ६० विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन आणि टोरेंट पॉवरचे अधिकारी उपस्थित असलेल्या या सत्राचा उद्देश तरुण मनांना विजेबद्दल आवश्यक ज्ञान देऊन सक्षम करणे हा होता. या सत्रात विजेशी संबंधित अत्यावश्यक विषयांवर लक्ष केंद्रित करण्यात आले, विद्यार्थ्यांना त्याचा उपयोग आणि त्याच्याशी संबंधित संभाव्य धोके याबद्दल मूलभूत माहिती दिली. दैनंदिन जीवनात सुरक्षिततेचे महत्त्व पटवून देत विद्युत उपकरणे वापरताना घ्यावयाची काळजी याविषयी उपस्थितांना प्रबोधन करण्यात आले. सत्राच्या मुख्य विषयांमध्ये वीज बचत तंत्रांवर चर्चा आणि विद्यार्थ्यांना घर आणि शाळेत ऊर्जा बचत पद्धतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहित करणे समाविष्ट होते. टॉरेंट पॉवरच्या अधिकाऱ्यांनी रेसिड्युअल करंट सर्किट ब्रेकर (RCCB) चे महत्त्व देखील दाखवून दिले, हे यंत्र विद्युत शॉक कसे टाळू शकते आणि जीव वाचवू शकते. परस्परसंवादी सत्रांनी विद्यार्थ्यांना सक्रियपणे व्यस्त राहण्याची, प्रश्न विचारण्याची आणि प्रात्यक्षिकांमध्ये सहभागी होण्याची संधी दिली, ज्यामुळे शिकण्याचा अनुभव माहितीपूर्ण आणि आनंददायक दोन्ही बनला. शाळेच्या व्यवस्थापनाने टोरेंट पॉवरचे समुदाय शिक्षण आणि सुरक्षेसाठी केलेल्या वचनबद्धतेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

शाळा व्यवस्थापनाच्या प्रतिनिधीने सांगितले की, हा उपक्रम केवळ विद्युत सुरक्षेबद्दल जागरूकता वाढवत नाही तर आमच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या घरापर्यंत आणि समाजापर्यंत पोहोचवू शकणाऱ्या ज्ञानाने सक्षम करतो.

# भिवंडीत २२७३ घरगुती, तर सार्वजनिक ३२४ विसर्जन, कृत्रिम तलाव ५० गणेश मूर्तींचे विसर्जन

भिवंडी शहरात दहा दिवस गणपती विसर्जन फार उत्साहात करण्यात आले. शहरातील मुख्य विसर्जन घाटांवर गणेश घाट, टिळक घाट प्रभाग समिति क्रमांक एक अंतर्गत ७१५ घरगुती, सार्वजनिक ९८, कृत्रिम तलाव ०१, तर प्रभाग समिती क्रमांक दोन अंतर्गत भादवड घाटावर ४४३ घरगुती, २३ सार्वजनिक, कृत्रिम तलावात ९, प्रभाग समिती क्रमांक तीन अंतर्गत वराळदेवी परिसरात घरगुती ९०१ सार्वजनिक १८६, कृत्रिम तलाव २७, प्रभाग समिती क्रमांक चार अंतर्गत घरगुती २४२ सार्वजनिक १७, कृत्रिम तलावात सात, समिती क्रमांक पाच येथे दोन कृत्रिम तलाव तयार करण्यात होते त्यामध्ये ६ गणेश मूर्तीचे विसर्जन करण्यात आले.

सर्व विसर्जन घाटांवर पालिका आयुक्त अजय वैद्य, तसेच अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, यांनी भेटी देऊन सर्व घाटावरील विसर्जन व्यवस्था पाहणी केली. सर्व घाटांवर पालिकेतर्फे वाहनांची चांगली सोय करण्यात आली होती, जीवन रक्षक पथक तैनात करण्यात आले होते, त्याचबरोबर क्रेनची व्यवस्था, तराफे तसेच सर्व घाटांवर नियंत्रण कक्ष तयार करण्यात आले होते. सर्व गणेश भक्तांकरता पिण्याच्या पाण्याचे सोय, वैद्यकीय आरोग्य पथक सज्ज ठेवण्यात आले होते. सर्व कर्मचारी यांच्याकरिता पुलाव, पाणी याची व्यवस्था देखील करण्यात आली होती. अग्निशमन विभागाचे कर्मचारी नियुक्त करण्यात आले होते. पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी स्वतः सर्व घाटांवर भेट देऊन प्रत्यक्ष विसर्जन कामाची पाहणी केली व गणेश भक्तांना कोणत्याही गैरसोय होणार नाही, अडचणी येणार नाहीत या कामी सर्व प्रभाग अधिकारी व संबंधित विभाग प्रमुख यांना सूचना दिल्या. दहा दिवसाला एकूण शहरात एकूण घरगुती २२७३ सार्वजनिक ३२४ अशा गणेश मूर्तींचे विसर्जन झाले. ५० गणेश भक्ताने कृत्रिम तलावाचा वापर केला. विसर्जना करता नियुक्त केलेल्या जीवन रक्षक पथकांचा पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी प्रमाणपत्र देऊन गौरव केला



दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !




■ उपाध्यक्ष भाजपा ठाणे शहर श्री. जयेंद्र चिंतामण कोळी व माजी नगरसेविका सौ. नम्रता जयेंद्र कोळी यांच्या घरातील विराजमान गणरायासोबत कोळी कुटुंब


■ ठाणे शहरातील विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना भेट देऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्री गणरायाचे मनोभावे दर्शन घेतले. यात लोकमान्य टिळकांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ठाणे शहरातील लोकमान्य आळी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, घंटाळी मंदीर गणेश, उथळसर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, श्रीनगर, वारली पाडा आणि किसन नगर नंबर २ परिसरातील विविध गणेशोत्सव मंडळांचा समावेश होता.



■ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा निवासस्थानी शिवसेना प्रवक्ते राहुल लोंढे यांनी गणरायाचे मनोभावे दर्शन घेतले.


■ आदर्श सांस्कृतिक, कला व क्रीडा मंडळ आयोजित गणेशोत्सव २०२४ शिवकालीन सजावट. मॉडेल कॉलनी को. ऑप. हौ. सोसायटी लि. शास्त्री नगर, ठाणे (प)


■ कल्याण(गणेश घावटे) : कल्याण पश्चिम रामदासवाडी येथील गणेश मित्र मंडळ सार्वजनिक गणेशोत्सव मोठ्या उत्साही वातावरणात साजरा. यंदा ३५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून राजदरबार अशी सुंदर सजावट करून देखावा सादर करण्यात आला होता.


■ देवद येथील पाटील कुटुंबियांच्या येथे दहा दिवसांच्या श्री. गणरायाचे आगमन झाले होते. अत्यंत भक्तिभावाने साजरा झालेल्या या गणोशोत्सवाला विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भेट देऊन दर्शन घेतले. मंगळवारी श्री मुर्तीचे विसर्जन करण्यात आले.

## गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या...


ठाण्यातील उथळशर येथील वाकरवाडी येथील धाना पुणे परिवाराने यंदाच्या वर्षी गणेशोत्सवात साकारला चाळ संस्कृतीचा देखावा भाविकांचे आकर्षण ठरले आहे. (छाया – मनोज सिंह)

## ‘ब्रो ठाणे बदलतंय!’ गणेश-विसर्जन मिरवणूक उत्साहात..

**ठाणे : हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांना अभिप्रेत असणारे तसेच राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून ‘ठाणे बदलतंय’ या विषयावर स्वातंत्र्यवीर सावरकरनगरातील सार्वजनिक उत्सव मंडळाने यंदा ५४ व्या वर्षी गणेशोत्सवानिमित्त अतिशय आगळावेगळा देखावा साकारला होता . शिवसेना गटनेते व मा. नगरसेवक दिलीप बारटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली साकारलेल्या या देखाव्याला ठाणेकर गणेशभक्तांनी अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.**





या निमित्ताने मंगळवारी १७ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशीला निघणाऱ्या गणेश विसर्जन मिरवणुकीत तरुणाईशी निगडित ‘ब्रो ठाणे बदलतंय’ चलचित्र देखाव्या सादर केला होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास वंदन करून.सिद्धार्थ संजय पांडे, युवासेन निरीक्षक, ठाणे-पालघर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून ‘ब्रो ठाणे बदलतंय!’ मिरवणुकीची सुरुवात करण्यात आली यावेळी शिवसेना गटनेते व मा. नगरसेवक दिलीप बारटक्के या वेळी संजय चिचकर अध्यक्ष,दीपक निकम सचिव, सखाराम अहिरे खजिनदार,अमित निकम आदि मान्यवर उपस्थित होते. धर्मवीर आनंद दिघे मार्ग, शिवसेना शाखा, स्व. सावरकर नगर येथून मिरवणूकचे प्रस्थान झाले.

आपल्या लाडक्या गणपती बाप्पाला निरोप देण्यासाठी या मिरवणुकीत पारंपरिक दिंडी, विविध वेशभूषांनी नटलेली तरुणाई हे या मिरवणुकीचे खास आकर्षण होते .तसेच श्रीलंकेच्या तलाईमन्नार भारतातील रामेश्वरमचे धनुष्कोडी हे सागरी २३ किलोमीटर अंतर पार करण्याचा आंतरराष्ट्रीय विक्रम केलेले ठाण्यातील १२ तरुण जलतरणपटू या मिरवणूकीत सहभागी होते. शिवाय नवी दिल्लीत प्रजासत्ताकदिनी कर्तव्यपथावर झालेल्या वंदे भारत संचलनामध्ये ठाण्यातील मुद्रा आर्ट अकादमीच्या भरतनाट्यम आणि लोकनृत्याच्या ११ मुलींना नृत्य सादर करण्याचा बहुमान मिळाला, त्या नृत्यांगना याही सहभागी होत्या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर जिम्नॅस्टीकमध्ये ठसा उमटवणारे ठाणेकर खेळाडू, आरोग्यासाठी संगीताच्या तालावर विशिष्ट व्यायामप्रकार म्हणजे रोबिक्सचे प्रात्यक्षिक सादर करणारे क्रीडापटू, ठाणे ते गोवा स्केटिंग करणारे आंतरराष्ट्रीय खेळाडू, प्रशिक्षक राहुल पंदिरकर यावेळी उपस्थित होते या मिरवणूक प्रतिनिधीक स्वरूपात पोलिस, नाविक दल, पदवीधर तरुण, परंपरा-संस्कृती-कला आणि आधुनिकता यांची सांगड घालणारी तरुणाई, डॉक्टर, परिचारिका, नृत्यांगना, वकील : क्रिकेटपटू, सैनिक, विकासक, मतदार, हवाईसुंदरी कथ्थक नर्तिका, वाचक... आदी समूहाने सहभाग घेतला.







## कोपरी जकात नाका मैदानावर ‘एमसीएचआय’तर्फे ‘रास रंग २०२४’ चे आयोजन

**ठाणे – महाराष्ट्राची सांस्कृतिक उपराजधानी असलेल्या समृद्ध व विकसित ठाणे शहरात यंदाही नवरात्रोत्सवात ‘रासरंग २०२४’ उत्सव भरविला जाणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ‘क्रेडाई-एमसीएचआय’ने २०१७ मध्ये सुरू केलेला हा कार्यक्रम यंदा नवी उंची गाठणार असून, ठाण्यातील हरिओम नगर येथील जकात नाक्यावरील भव्य मैदानावर ३ ते १२ ऑक्टोबरदरम्यान दररोज सायंकाळी ७ वाजता मातेच्या आरतीने उत्सवाला सुरुवात होईल. या उत्सवाचे अनंत चतुर्दशीच्या दिवशी आज मंगलमय वातावरणात भूमिपूजन करण्यात आले.**

- ■ नवरात्रोनिमित्ताने ३ ऑक्टोबरपासून उत्सवाला जल्लोषात सुरूवात
- ■ बॉलिवूडमधील ‘ढोल किंग’ हनिफ, अस्लम आणि उमेश बारोट यांची उपस्थिती
- ■ प्रसिद्ध गायिका द्रविता चोक्सी ओबेरॉय, फिरोज लडका, हेली मजुमदार, रुपाली कश्यप यांचे सूर

‘क्रेडाई-एमसीएचआय’ ठाणे चे अध्यक्ष जितेंद्र मेहता यांनी आज भूमिपूजनानंतर आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. तत्पूर्वी भूमिपूजन कार्यक्रमाला शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के, माजी नगरसेवक विकास रेपाळे, नम्रता भोसले, ‘क्रेडाई-एमसीएचआय’ ठाणे चे अध्यक्ष जितेंद्र मेहता, ‘एमसीएचआय’चे पदाधिकारी सचिन मिराणी, फैयाज मिराणी, अमरसिंह ठाकूर, भरत मेहता, भावेश गांधी, कल्पतरु डोअर्सचे व्ही. के. पटेल, को-ऑर्डिनेटर जय ठक्कर आदी उपस्थित होते.

बदलत्या ठाण्यातील नागरिक व तरुण पिढीची स्पंदने लक्षात घेऊन ‘क्रेडाई-एमसीएचआय’ने आशर ग्रूप व जनसेवा प्रतिष्ठानच्या सहकार्याने ठाण्यात यंदाही रास-रंग उत्सव भरविला आहे. बॉलिवूडमधील ‘ढोल किंग’ हनिफ, अस्लम आणि उमेश बारोट यांच्या उपस्थितीत प्रसिद्ध गायिका द्रविता चोक्सी ओबेरॉय, फिरोज लडका, हेली मुझुमदार, रुपाली कश्यप यांच्या सूरामध्ये भाविकांना दांडियाचा आनंद लूटता येईल. त्याचबरोबर दररोजच्या आरतीवेळी प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेते व अभिनेत्रींची उपस्थिती राहील, अशी माहिती ‘क्रेडाई-एमसीएचआय’ ठाणेचे अध्यक्ष जितेंद्र मेहता यांनी दिली. या उत्सवामुळे ठाण्याच्या सांस्कृतिक लौकिकात भर पडली आहे, असे श्री. मेहता यांनी पत्रकार परिषदेत नमूद केले.



विजेची आकर्षक व नेत्रदीपक रोषणाई आणि सुरेल संगीताच्या ठेक्यामध्ये भाविकांना पारंपरिक वेशभूषा करून दांडिया नृत्याचा आनंद लुटता येईल. या कार्यक्रमाचे निवडक उपक्रम वाहिन्या, स्थानिक टीव्ही चॅनल आणि www. rassrang.in या वेबसाईटवर थेट प्रसारण केले जाईल, अशी माहिती ‘क्रेडाई-एमसीएचआय’ ठाणेचे सचिव मनिष खंडेलवाल यांनी दिली. या उत्सवाला आयएएस, आयपीएस यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांचीही उपस्थिती राहील, असे ते म्हणाले.

या दहा दिवसांच्या उत्सवाला १२ हजारांहून अधिक भाविकांची उपस्थिती अपेक्षित आहे. ठाणे शहराबरोबरच मुंबई, कल्याण, डोंबिवली, भिवंडी येथील नागरिकांकडून रासरंग उत्सवाला आवर्जून उपस्थिती दर्शविली जाते. त्यादृष्टीकोनातून भव्य उत्सवाचे नियोजन केले जात आहे. बॉलिवूड अभिनेते-अभिनेत्रींबरोबर सुमधूर संगीताच्या साथीने हा उत्सव भाविकांच्या स्मरणात राहील, असा विश्वास ‘क्रेडाई-एमसीएचआय’ ठाणेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

दरवर्षी रासरंग उत्सवातील गर्दीत वाढ होत असून, ठाण्यातील नवरात्रोत्सवात हा उत्सव लोकप्रिय आहे. या पार्श्वभूमीवर ‘क्रेडाई-एमसीएचआय’ने १ लाख चौरस फूट क्षेत्रफळात उत्सव भरविला आहे. दांडिया नृत्य करणाऱ्यांसाठी जमिनीवर लाकडी प्लॅटफॉर्म टाकले जाणार असून, सुरक्षेसाठी २०० हून अधिक बाऊन्सर्स व सुरक्षा रक्षक, ५० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेरे यांच्यासह आपत्कालीन परिस्थितीसाठी डॉक्टरांसह वैद्यकीय पथक तैनात केले जाईल.

सहभागी होणाऱ्या भाविकांसाठी भव्य अँपल पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे. या उत्सवाच्या अधिक माहितीसाठी सुमित गुडका – दूरध्वनी क्रमांक ९३२२६८२०१० यांच्याबरोबर संपर्क

‘महाराष्ट्र सम्राट’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१